**आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प अंतर्गत**
**राज्य समन्वयक संस्था**
**सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटयुट,(स्टापी)**
**म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, पहिला मजला, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कॉलनी,**
**येरवडा, पुणे- ४११००६**
**दुरध्वनी क्र. ०२०-२६६८२७१४, २६६८ ७९००, २६६९६२१२, २६६८४६४१**
**Fax – 020-26695646 Email.ID- stapipune@gmail.com**

## आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प तपशील :

**राष्ट्रीय आरोग्य अभियान** अंतर्गत आरोग्य सेवांवर **लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प (CBMP)** एकुण १७ जिल्ह्यात राबविला जात आहे.

जनतेस प्रमाणित आरोग्य सेवा पुरविण्याच्या शासनाच्या उद्दिष्टांच्या अनुषगांने राज्यात आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प (CBMP) एकुण १७ जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत, सार्वजनिक आरोग्य यंत्रणा व स्थानिक स्वयंसेवी संस्था यांचे मदतीने व समन्वयाने राबविला जात आहे.

शासकीय सार्वजनिक आरोग्य यंत्रणा लोकाधारित होण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक आरोग्य सेवांच्या दर्जामध्ये सातत्य व गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने राज्यात आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया अधिकाधिक लोकाभिमुख तसेच सक्रीय लोकसहभागातून व समन्वयातून पुढे जाण्याच्या दृष्टीने सेवांवर देखरेख व नियोजन लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया (CBMP) ह्या प्रकल्पांतर्गत सुरु झाली.

महाराष्ट्रात, आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया (CBMP) ही आरोग्य क्षेत्रातील एक ठोस यंत्रणा असून आरोग्य क्षेत्रातील सुधारणांचा आढावा व त्यावर लोकसहभाग व सर्वसमावेशकतेतून आरोग्य सेवांची बांधिलकी उत्तरदायित्व व सार्वजनिक आरोग्य सेवा व सुविधा पुरविण्याची पारदर्शकता अभिप्रेत आहे.

आरोग्य विषयक प्रश्नांचा पाठपुरावा करुन सकारात्मक दृष्टीकोनातून व लोकसहभागातून ग्रामीण भागातील जनतेला विश्वासार्ह आणि परवडेल अशी आरोग्यसेवा उपलब्ध होऊन एक निकोप आणि निरोगी आरोग्यदायी समाज निर्माण होण्यासाठी ह्या प्रकल्पाची मोलाची मदत होत आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई अंतर्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प राबविण्यासाठी **अमरावती, चंद्रपूर, अहमदनगर** या तीन जिल्ह्यांत जिल्हा समन्वयक संस्था व **चंद्रपूर, आणि रायगड** ह्या जिल्ह्यातील प्रत्येकी एका तालुक्यात तालुका समन्वयक संस्था निवडीसाठी नोंदणीकृत सामाजिक स्वयंसेवी संस्थांकडून दिनांक २५/७/२०१८ पर्यंत किंवा पूर्वी अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रकल्पाची माहिती, संस्था निवडीचे निकष व अर्ज सादरीकरणाचा विहित नमुना सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटयुट या राज्य नोडल संस्थेच्या **www.stapi.org** संकेत स्थळावर उपलब्ध आहे. विहित नमुन्यातील प्रस्ताव दिनांक २५/७/२०१८ पर्यंत किंवा पूर्वी नोंदणीकृत टपाल /कुरिअरने पाठवावेत.

अंतिम तारखेनंतर आणि ईमलद्वारा पाठविलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. प्रस्ताव निवडीचे सर्व अधिकार राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई आणि सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटयुट (स्टापी), संस्थेकडे राखीव आहेत.

**संस्था निवडीचे निकष :**

*१) ग्रामीण भागात सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करण्याची संस्थेची प्रमुख भूमिका असणार आहे.*

*२) आरोग्य सेवांचे सामाजिक उत्तरदायित्व वाढविणे/लोकांकडून हामीच्या आरोग्य सेवाबददलची मागणी बळकट करणे, आरोग्य हक्कासाठी व जबाबदाऱ्यांसाठी स्थानिक जनतेला सक्रिय करणे आणि विशेषत: ग्रामीण भागात आरोग्यावर आधारित उपक्रम राबविण्याची क्षमता व तत्सम अनुभव आवश्यक*

*३) लोकाभिमुख व लोकसहभागातून सार्वजनिक आरोग्य सेवा अनुषगांने प्रशिक्षणे कार्यशाळा तसेच आरोग्य क्षेत्रात विविध संशोधने (माहिती संकलन ) व विश्लेषण ह्या प्रकारच्या कामाचा अनुभव आवश्यक*

*४) सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात व इतर सामाजिक क्षेत्रात सहयोगी पध्दतीने पूर्णवेळ उपलब्ध असलेला काम करत असलेले अनुभवी कर्मचारी*

*५) जिल्हा आणि तालुका स्तरावरील सार्वजनिक आरोग्य सेवा यंत्रणाबरोबरच इतर शासकीय निमशासकीय संस्था / यंत्रणा /घटकाबरोबर काम करण्याचा अनुभव*

*६) लोकाधारित व लोकसहभागातून लोक संघटन, संवर्धन व सक्षमीकरणाचा अनुभव व लोकाधारित प्रक्रिया संकलन अनुभव*

# जिल्हा व तालुका स्तरीय संस्था अर्ज

## विभाग : १ संस्थेची माहिती

<table>
<tr><td>१</td><td>संस्थेचे नाव, पुर्ण पत्ता व संपर्क तपशील (दूरध्वनी क्र व ईमेल आय डी)</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>२</td><td>संपर्क व्यक्तीचे नाव व संपर्क तपशील (दूरध्वनी क्र व भ्रमणध्वनी क्र. )</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>३</td><td>संस्थचे संकेत स्थळ (Website)</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>४</td><td>संस्थेचे ध्येय (Vision )</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>५</td><td>संस्थेचे मिशन (Mission)</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>६</td><td>संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी तपशील</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>७</td><td>मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये तपशील</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>८</td><td>आयकर कायदयातील १२ अ अन्वये नोंदणी तपशील</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>९</td><td>आयकर कायदयातील ८० जी अंतर्गत करसवलत तपशील</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>१०</td><td>परकीय निधी नियंत्रण कायदा २०१० नोंदणी अन्वये नोंदणी वर्ष व नोंदणी क्रमांक</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td rowspan="2">११</td><td rowspan="2">गेल्या तीन वर्षातील संस्थेची आर्थिक उलाढाल अर्जासोबत मागील तीन वर्षाचे लेखाअंकेक्षण अहवाल (Audited Reports ) जोडावेत.</td><td>आर्थिक वर्ष</td><td>२०१७-२०१८ (Audited or Unaudited</td><td>२०१६-२०१७</td><td>२०१५-२०१६</td><td>२०१४-२०१५</td></tr>
<tr><td>रुपये</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>१२</td><td>संस्थेचे भौगोलिक कार्यक्षेत्र (जिल्ह्याच्या नावाचा स्पष्ट उल्लेख करावा) ग्रामीण व शहरी दोन्हीही</td><td colspan="5"></td></tr>
</table>

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | **संस्थेचे उपक्रम व प्रकल्प** संस्थेचा विविध सामाजिक क्षेत्रातील तसेच विविध घटकांबरोबर काम करण्याचा अनुभव कृपया माहिती विहित नमुन्यात द्यावी. | **अ.क्र.** | **प्रकल्प / उपक्रम तपशील** | **प्रकल्पांतर्गत हाती घेतलेले उपक्रम** | **अपेक्षित साध्य** | **उपक्रम परिणाम कारकता** | **प्रकल्प निधी/अनुदान स्त्रोत तपशील** | **कालावधी** |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**विभाग :- २ संस्था विशवस्त / नियामक मंडळ :-**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | संस्था प्रमुखाचे नाव | | | | | | |
| १५ | संस्थेच्या विश्वस्त मंडळाची विस्ताराने माहिती | | | | | | |
| १६ | संस्थेचे एकूण कर्मचारी: | अ.क्र | नाव | वय | शिक्षण | नियामक / विश्वस्त मंडळातील स्थान /पद | इतर सामाजिक संस्थांची संलग्नता |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**टीप : सूचना - १. अर्ज / प्रस्ताव पूर्ण भरणे आवश्यक आहे. सदर अर्ज / प्रस्ताव ३ प्रतीत सादर करावा.**
**२. एखादी माहिती/दस्ताऐवज उपलब्धतेमध्ये अडचण असल्यास कृपया तसा स्पष्ट उल्लेख करावा.**
**३. अर्ज /प्रस्ताव-सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटय़ुट, म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, पहिला मजला, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे - ४११ ००६. ह्या पत्त्यावर पाठवावा. तसेच लिफापावर जिल्हास्तरीय संस्था / तालुकास्तरीय संस्था असे नमुद करा.**

## अर्जासोबत जोडावयाचे दस्ताऐवज

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र
२. मागील ३ वर्षाचे आर्थिक व वार्षिक अहवाल (२०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७ व २०१७-२०१८ (Audited or Unaudited)
३. लोकसहभाग सार्वजनिक आरोग्य आणि इतर सामाजिक क्षेत्रात हक्काधारित / देखरेख दृष्टीकोनातून केलेल्या कार्याची माहिती व अहवाल
४. सार्वजनिक आरोग्य व इतर सामाजिक क्षेत्रात मुल्यमापन केल्याचे आणि विविध सामाजिक मुद्यांवर प्रशिक्षण / कार्यशाळा माहिती व अहवाल
५. सामाजिक उत्तरदायित्व वाढविण्यासाठी आरोग्य किंवा इतर सामाजिक विषयांवर माहिती शिक्षण संवाद व मन परिर्वतन संवादांच्या माध्यमातून (IEC & BCC) केलेल्या उपक्रमांची माहिती व अहवाल